खालील (क्यू आर कोड) स्कॅन करा...
आणि अक्षराज मीडियाच्या व्हाट्सअप चॅनल ला फॉलो करा व मिळवा सर्व घडामोडींचे अपडेट्स एकाच वेळी एकाच ठिकाणी...
कृपया इथे स्कॅन करा — Plz Scan Here

दैनिक अचूक वेध, अचूक बातमी
# अक्षराज
संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध
Email : newsaksharaj2021@gmail.com

वर्ष : ०५ | अंक : १२०, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, शनिवार, दि.१३ डिसेंबर २०२५ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056

आजचा सुविचार
स्वत:ला कधीही कमी लेखू नका; तुमच्या आत्मविश्वासाने अशक्य गोष्टी सुद्धा शक्य होऊ शकतात.

# ‘त्या’ मंत्र्यांवर बिबट्या सोडा, सुधीर मुनगंटीवार सभागृहात प्रचंड आक्रमक

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१२, नागपूर :** विधीमंडळाचं सध्या हिवाळी अधिवेशन सुरु आहे. हिवाळी अधिवेशनाचा आज पाचवा दिवस आहे. अधिवेशनाच्या पाचव्या दिवशी विधानसभेच्या सभागृहात भाजप आमदार सुधीर मुनगंटीवार हे प्रचंड आक्रमक झालेले बघायला मिळाले. मंत्र्यांच्या अनुपस्थितीवर सुधीर मुनगंटीवार हे आक्रमक झाले. आमदार सभागृहात उपस्थित असताना जे मंत्री उपस्थित राहणार नाहीत त्यांच्यावर बिबट्या सोडा, असं वक्तव्य सुधीर मुनगंटीवार यांनी केलं. घरकुल योजनेच्या पात्र लाभार्थ्यांना निधी मिळत नसल्याने सुधीर मुनगंटीवार सभागृहात प्रचंड संतापलेले बघायला मिळाले. सभागृहात यावेळी नेमकं काय-काय घडलं, ते आपण जाणून घेऊयात.

तालिका अध्यक्ष समीर कुणावार यांनी अर्धा तास चर्चा क्रमांक ११. सुधीर मुनगंटीवार आहेत का?, असा प्रश्न केला. त्यावर सुधीर मुनगंटीवार यांनी हो, आहे. इकडेच आहे. अहो माढी साईजही मोठी आहे. दिसलो पाहिजे, असं म्हणाले. यानंतर तालिका अध्यक्षांनी पण मंत्री महोदय आहेत का? असा प्रतिप्रश्न केला. त्यावर सुधीर मुनगंटीवार भडकले. मंत्री महोदय आणण्याची जबाबदारी आमची नाही. ती तुमची आहे. आम्ही आपले उपस्थित आहोत. आता सभागृहात आमदार उपस्थित असताना मंत्री उपस्थित नसल्यावर त्यांच्यावर बिबट्या सोडा. हे धंदे आता बंद करा, अशा शब्दांत सुधीर मुनगंटीवार यांनी तालिका अध्यक्षांना सुनावलं. यावेळी तालिका अध्यक्षांना अधिकाऱ्यांनी मंत्री सभागृहात उपस्थित असल्याची माहिती दिली. त्यावर त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना आपल्याला का सांगितंल नाही, सांगितलं असतं तर आपण कशाला असा प्रश्न केला असता, असं बोलताना बघायला मिळाले. यानंतर सुधीर मुनगंटीवार हे आपला प्रश्न मांडतात.

**सुधीर मुनगंटीवार नेमकं काय म्हणाले?**

ग्रामीण भागात असणाऱ्या गरीब भटक्या-विमुक्त जातीमध्ये येणाऱ्यांसाठी ही चर्चा मी उपस्थित केलेली आहे. राज्यातील यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजनेमार्फत जे शेवटच्या प्रवाहात आहेत त्या लोकांसाठी २०११ मध्ये घरकुल योजना करण्यात आली. २०११ मध्ये ही योजना करण्यात आली तेव्हा स्वर्गीय यशवंतराव चव्हाण यांचं नाव योजनेला दिलं. ७० हजार रुपयांच्या योजनेवरुन १ लाख २०



हजार रुपयांपर्यंतचा निधी वाढवला. पण अध्यक्ष महाराज, बोलाची कडी, आणि बोलाची भात असं या योजनेचं झालं. तुम्ही महाराष्ट्रात किती घरकूल मंजूर केले, यावर मी जात नाही. पण आता यशवंतराव घरकूल योजनेत ज्या भटक्या विमुक्त जातीच्या नागरिकांचे घरकूल मंजूर आहे त्यांना पैसे दिले जात नाहीत. १ हफ्ता दिला की, दुसऱ्या हफ्त्यासाठी वाट पाहावी लागते. बिरबलाची खिचडी शिजेल पण तुमचा निधी येत नाही.

मला तुमच्याकडून स्पष्ट आश्वासन हवं आहे. कारण आमच्या मतदारसंघात ९६ कोटींचा निधी आवश्यक आहे. मुंबईमध्ये असणाऱ्यांसाठी राज्य सरकारकडे पैसे आहेत. पण भटक्या विमुक्त नागरिकांसाठी पैसे नसतील तर कोरड्या विहिरीत अशा अधिकाऱ्यांनी जीव दिला पाहिजे. रेती दिली जात नाही, निधी दिला जात नाही, मग करायचं काय? तुम्ही खरे ओबीसी नेते असाल तर भटक्या विमुक्त जातींना न्याय दिला पाहिजे.

**मंत्र्यांकडून मुनगंटीवार यांना प्रत्युत्तर...**

मंत्री अतुल सावे यांनी त्यावर उत्तर दिलं. सुधीर मुनगंटीवार हे ज्येष्ठ सदस्य आहेत. मला आपल्याला सांगायला आनंद होतोय की, या पुरवणी मागणीमध्ये या योजनेसाठी ३०० कोटी मंजूर झाले आहेत. शंभर टक्के निधी ताबोडतोब दिला जाईल, अशी ग्वाही मंत्री अतुल सावे यांनी दिली.

## शिवराज पाटील यांना मुख्यमंत्र्यांकडून श्रद्धांजली

**अक्षराज : जे. के. पोळ**



**दि.१२, मुंबई :** महाराष्ट्राच्या राजकीय क्षेत्राच्या शालिनता, सुसंस्कृततेचा लौकिक जपणारे आणि तो राष्ट्रीय - आंतरराष्ट्रीय पोहचविणारे नेतृत्व म्हणून ज्येष्ठ नेते शिवराज पाटील- चाकूरकर सदैव स्मरणात राहतील, अशा शब्दांत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी माजी लोकसभा अध्यक्ष, केंद्रीय मंत्री शिवराज पाटील - चाकूरकर यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली आहे. त्यांच्या निधनामुळे राजकारण- समाजकारणातील उत्तुंग अशा मार्गदर्शक नेतृत्वाला मुकलो आहोत, अशी शोकभावना मुख्यमंत्री फडणवीस यांनी व्यक्त केली आहे.

शोकसंदेशात मुख्यमंत्री म्हणतात, चाकूरकर यांनी लातूरचे नगराध्यक्ष म्हणून राजकारणात पाऊल टाकले. महाराष्ट्राच्या विधानसभेचे उपाध्यक्ष, अध्यक्ष, संसदेच्या अनेकविध समि त्यांचे सदस्य आणि पुढे केंद्रातील विविध खात्यांचे मंत्री आणि लोकसभा अध्यक्ष, पंजाबचे राज्यपाल अशी त्यांची कारकिर्द राहिली.

लोकसभा सदस्य म्हणून ते सातवेळा निवडून आले होते. लोकसभा अध्यक्ष म्हणून त्यांनी संसदेशी निगडित अनेक अभिनव उपक्रमांना आवर्जून चालना दिली. चाकूरकर यांचा वकील म्हणून संविधानाचा गाढा अभ्यास होता. त्यातूनच त्यांनी लोकसभेतील संसदीय कार्य प्रणाली आणखी बळकट केली. तत्वनिष्ठ, अभ्यासपूर्ण आणि ठामपणे मांडणी करणारे नेतृत्व म्हणून त्यांना देशाच्या राजकारणात आदराचे स्थान होते. चाकूरकर यांच्या निधनामुळे राजकारण-समाजाकारणात सभ्यता, सुसंस्कृतता जपणारे, लोकशाहीवर गाढा विश्वास असणाऱ्या ज्येष्ठ नेतृत्वाला महाराष्ट्र सुपुत्राला आपण मुकलो आहोत. चाकूरकर कुटुंबीय आणि त्यांच्या कार्यकर्त्यांवर आघात झाला आहे. या सर्वांच्या दुःखात आम्ही सहभागी असून, ईश्वराने त्यांना हा आघात सहन करण्याची ताकद द्यावी अशी प्रार्थना करतो आणि ज्येष्ठ नेते शिवराज पाटील चाकूरकर यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करतो, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले आहे.

## नवी मुंबईकरांसाठी महत्त्वाची बातमी!
## डिसेंबरमध्ये आठवड्यातून दोन दिवस पाणीकपात

**दि.१२, नवी मुंबई :** नवीमुंबईकरांसाठी एक चिंताजनक माहिती समोर आली आहे. एमआयडीसीने डिसेंबर महिन्यात उरण परिसरात आठवड्यातून दोन वेळा पाणीकपात करण्याचा निर्णय घेतला आहे. रानसाई धरणातील पाणी साठा मोठ्या प्रमाणात घटल्याने आणि मागणी-पुरवठा यामध्ये निर्माण झालेल्या तफावतीमुळे हा निर्णय घेण्यात आला आहे. त्यामुळे नागरिकांना संपूर्ण महिनाभर पाण्याच्या तुटवड्याचा सामना करावा लागणार आहे.

उरणमधील रानसाई धरणाचा पाणी साठा सध्या चिंताजनक पातळीवर पोहोचला असून, तो स्थिर ठेवण्यासाठी ही कपात अपरिहार्य झाली आहे. या धरणाची क्षमता कमी असल्यामुळे पावसाळ्यात मोठ्या प्रमाणात पाण्याची नासाडी होते आणि आवश्यकतेनुसार साठवणूक करता येत नाही. त्याचाच परिणाम म्हणून दरवर्षी उरणमधील रहिवाशांना पाण्यासाठी हाल करावे लागतात. या भागात दिवसाला तब्बल ४१ मिलियन लिटरहून अधिक पाणी वापरले जाते, तर सध्याच्या उपलब्ध साठ्यानुसार एमआयडीसी फक्त ३० मिलियन लिटर पुरवठा करू शकते. त्यामुळे उपलब्ध साठा जास्तीत जास्त काळ टिकवण्यासाठी आठवड्यातून दोन दिवस पाणीपुरवठा बंद ठेवण्याचा निर्णय घेतला आहे.

*** कधी होणार पाणीकपात?**

या पाणीकपातीचा अवलंब दर मंगळवारी आणि शुक्रवारी करण्यात येणार आहे. जून २०२६ पर्यंत पाणी उपलब्ध राहावे, यासाठी ही संवर्धनात्मक रणनीती आखण्यात आली असून, अधिकाऱ्यांनी पुरवठा नियंत्रित ठेवणे आवश्यक असल्याचे सांगितले आहे.

## मतदारसंघातील विविध मागण्यांसंदर्भात आ.दातेंचा अधिवेशनात बुलंद आवाज

**रस्ते, सौर पंप, बिबट्यांचा धोका, अतिवृष्टी नुकसानभरपाई, स्थानिक रोजगारावर शासनाचे लक्ष वेधले...**

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.१२, पारनेर (अहिल्यानगर) :** सध्या नागपूर येथे सुरु असलेल्या हिवाळी अधिवेशनात पारनेर-नगर विधानसभा मतदारसंघाचे आमदार काशिनाथ दाते सरांनी नियम २९३ अंतर्गत बोलताना तालुक्याच्या सर्व तातडीच्या व जनहिताच्या मुद्द्यांवर प्रभावीपणे आवाज उठवला.

सुरवातीला आमदार दाते सरांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार व उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अतिवृष्टीग्रस्तांसाठी तातडीने मदत जाहीर केल्याबद्दल अभिनंदन केले. मात्र पारनेर तालुक्यातील पारनेर व कान्हूर पठार ही महसूल मंडळे नुकसानभरपाईपासून वंचित राहिल्याने त्यांच्यातील २५-३० गावांतील शेतकरी अद्यापही मदतीपासून दूर आहेत, अशी गंभीर बाब त्यांनी सभागृहाच्या निदर्शनास आणली. पर्जन्यमापक यंत्र फक्त एकाच गावात असताना त्यावर आधारित निर्णय देणे अन्यायकारक असल्याचेही ते म्हणाले.




त्यानंतर आमदार दाते यांनी सौर शेतीपंप बसविण्यात येत असलेल्या अडचणींबाबत तीव्र नाराजी व्यक्त केली. शेतकऱ्यांनी ऑनलाइन अर्ज करून वर्षभरापासून प्रतीक्षा केली तरी पंप बसवले जात नसल्याचे सांगून, तातडीने कार्यवाही करून सर्व प्रलंबित मागण्या मंजूर कराव्यात, अशी मागणी त्यांनी केली. सलग क्षेत्राच्या अटीमुळे अनेक शेतकरी पात्र ठरत नसल्याने ही अट रद्द करण्याचेही त्यांनी सुचविले.

पुढे बोलताना बिबट्यांच्या वाढत्या हल्ल्यामुळे मतदारसंघात निर्माण झालेल्या भीतीच्या वातावरणावरही आमदार दाते यांनी गंभीर चिंता व्यक्त केली. पारनेरमध्ये आतापर्यंत सहा जणांचे प्राण गेले असून पाळीव जनावरांचे मोठे नुकसान झाले आहे. बिबट्या दिसेल तिथे पकडण्याची / मारण्याची परवानगी द्यावी, शेतावर राहणाऱ्या शेतकऱ्यांच्या घरांना व गोठ्यांना संरक्षणात्मक तार कंपाउंड देण्यासाठी शासनाने योजना आणावी, अशी त्यांनी ठाम मागणी केली. याशिवाय मतदारसंघातील सुपा चखूउ मध्ये स्थानिकांना रोजगार न देणाऱ्या उद्योजकांवर शासनाने कठोर भूमिका घ्यावी, अशा शब्दांत त्यांनी स्थानिक तरुणांच्या नाराजीची दखल घ्यायला भाग पाडले.

अवकाळी पाऊस व अतिवृष्टीमुळे मतदारसंघातील रस्ते, मोरीपूल, बंधारे मोठ्या प्रमाणात वाहून गेल्याने त्यांचे प्रस्ताव शासन पातळीवर प्रलंबित आहेत. हे प्रस्ताव आपत्ती व्यवस्थापन निधीतून तातडीने मंजूर करून पुढील पावसाळ्यापूर्वी दुरुस्ती पूर्ण करावी, अशी विनंतीही त्यांनी सभागृहात केली. तसेच नगर तालुक्यातील केडगाव-सोनेवाडी-अकोळनेर हा केंद्राच्या इंधन वाहतुकीचा महत्त्वाचा मार्ग असूनही रस्त्याची दुरवस्था बिकट आहे. हा रस्ता राज्य सरकारमार्फत दुपदरी व मजबूत करण्याची मागणीही आमदार दाते यांनी यावेळी केली.

# विधानसभेत तुकाराम मुंढे यांच्या निलंबनाची मागणी

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१२, नागपूर :** नागपूर महापालिकेचे माजी आयुक्त तुकाराम मुंढे यांच्यावरील आरोप, स्मार्ट सिटीतील अनियमितता, महिला अधिकाऱ्यांना दिलेला कथित मानसिक त्रास आणि कोविड काळातील निर्णयांवरून विधानसभा दणाणून गेली. आमदार कृष्णा खोपडे आणि प्रवीण दटके यांनी मुंढे यांच्या निलंबनाची जोरदार मागणी केली. तर मंत्री उदय सामंत यांनी सर्व प्रलंबित चौकशांचे अहवाल २० दिवसांत मिळतील आणि त्यानुसार कारवाई केली जाईल, असे स्पष्ट केले.

आमदार कृष्णा खोपडे, प्रवीण दटके, मोहन मते, प्रताप अडसड यांनी याबाबतची लक्षवेधी मांडली. २० वर्षांत २४ बदल्या, सात महिन्यांत नागपुरात घोळ, विकासाच्या नावावर झिरो, पण मीडिया-एनजीओ प्रेमी, कोरोनाकाळात रुग्णालये असूनही ४० किमी अंतरावरील मोकळ्या जागेत ५ हजार खाटांचे हॉस्पिटल उभारले मात्र ते वाऱ्यात उडाले. चुकीच्या निर्णयांमुळे ४० हजार कोटींचे नुकसान झाले. १७ कर्मचाऱ्यांना चुकीच्या पद्धतीने नोकरीतून काढले. स्मार्ट सिटीचा अधिकार नसताना १९ कोटींचे बिल एका विशिष्ट कंत्राटदाराला दिले, असा आरोप आमदारांनी केला. महिला अधिकाऱ्यांना रवीभवन कॉटेजमध्ये बोलावून मानसिक त्रास दिला, महिला आयोगानेही याची दखल घेतली, अशा आरोपांच्या फैरी सोडत अधिकाऱ्यांचा बचाव करू नये. मुंढे यांना ताबडतोब निलंबित करा, अशी मागणी खोपडे यांनी केली. या प्रकरणाची चौकशी मुख्य सचिव व पोलिस महासंचालक दर्जाचे अधिकारी यांच्या मार्फत करण्याचीही त्यांनी मागणी केली.

कोरोनाकाळात स्मार्ट सिटीचे अधिकार मिळालेल्या मुंबई आयुक्तांनी तोंडी आदेश दिल्याने मुंढे यांनी काही स्मार्ट सिटीची कामे पाहिली. २० कोटींच्या बिलासंदर्भात त्यांना दोन चौकशांत क्लिनचिट मिळाली आहे. 'ईओडब्ल्यू'ची चौकशी पूर्ण झाली असून तक्रारींमध्ये दोष



आढळला नाही. महिला अधिकाऱ्यांच्या तक्रारीवरील चौकशी अंतिम टप्प्यात असून २० दिवसांत अहवाल मिळेल. मुंढे यांची नियुक्ती तत्कालीन मुख्यमंत्र्यांच्या स्वाक्षरीनेच झाली होती, असे मंत्री उदय सामंत म्हणाले.

**‘एकदाचा विषय संपवा’**

नगरविकास विभागाने आदेश जारी केले असतील तर स्पष्ट सांगावे, असे खोपडे म्हणाले. संपूर्ण स्मार्ट सिटीच्या चौकशीची मागणी आमदार नाना पटोले यांनी केली. स्मार्ट सिटीवर किती खर्च झाला, कोणत्या नियमांची पायमल्ली झाली, याची माहितीही सादर करावी, असे पटोले म्हणाले. २० ऑक्टोबर २०२५ रोजी आलेल्या पत्रात प्रवीण परदेशी यांनी स्पष्ट केले की मुंढेंना सीईओचे अधिकारच दिले नव्हते. सचिवांनीही त्यांची नियुक्ती बेकायदेशीर असल्याचे म्हटले आहे. महिला अधिकाऱ्यांच्या तक्रारी केंद्रीय महिला आयोगात प्रलंबित आहेत, याकडे आमदार दटके यांनी लक्ष वेधले.

चौकशीत मुंढे निर्दोष आढळले, असे असतानाही त्यांच्यावर वारंवार आरोप होत आहेत. त्यामुळे प्रकरण सीबीआय किंवा इतर उच्चस्तरीय एजन्सीकडे पाठवा. जर दोषी असतील तर कारवाई अनिवार्य आहे. मात्र आमदार जोरात बॉलिंग करतात आणि मंत्री तो हळुवार टोलवतात, हे किती दिवस चालणार, असे म्हणत हा विषय एकदाचा संपवा, अशी मागणी आमदार विजय वडेट्टीवार यांनी केली. यावर सामंत यांनी 'ईओडब्ल्यूने चौकशी केली असून संबंधित अहवाल सभागृहात सादर केला जाईल, असे सांगितले.




## उच्च शिक्षणातील ईएसजी- भिमुखता

क्वाक्वारेली सिमंड्स (क्यूएस) ही ब्रिटिश संस्था दर वर्षी जगभरातील विद्यापीठे व उच्च शिक्षण संस्थांचे मूल्यमापन जाहीर करते. अध्यापनाचा दर्जा, संस्थेची प्रतिमा, संशोधन कार्य व त्याचा परिणाम, विद्यार्थी व अध्यापक यांचे प्रमाण, आंतरराष्ट्रीय स्तरावरील संस्थेची पोच, विद्यार्थ्यांचा अनुभव अशा काही निकषांवर ते केले जाते. जगभरातील विद्यापीठांची ही यादी २००४पासून प्रसिद्ध केली जाते. गेली तीन वर्षे त्यामध्ये भर पडून, ही संस्था शाश्वततेच्या निकषांवरही स्वतंत्र यादी प्रसिद्ध करू लागली आहे. नोव्हेंबरच्या सुरुवातीला २०२६साठीची अशी मानांकन यादी 'क्यूएस'ने प्रसिद्ध केली. केवळ अध्यापन आणि संशोधन कार्यामध्येच नव्हे, तर कॉर्पोरेट क्षेत्रात ज्या ईएसजी संकल्पनेचा बोलबाला आहे, त्यामध्ये या विद्यापीठांची कामगिरी कशी आहे, त्याची दखल या मानांकनासाठी घेण्यात आली. ईएसजी म्हणजे एनव्हायर्न्मेंटल, सोशल अँड गव्हर्नन्स. म्हणजे पर्यावरणीय समतोल, सामाजिक जबाबदारी आणि प्रशासकीय कारभार या तीन कसोट्यांवर ही विद्यापीठे कशी कामगिरी करतात, याचे प्रतिबिंब या मूल्यमापनात उमटते.

या यादीमध्ये यंदा जगभरातील शंभरहून अधिक देशांमधील दोन हजारांहून अधिक विद्यापीठांचा समावेश आहे. पहिल्या दोनशेमध्ये कोणतेही भारतीय विद्यापीठ नसले, तरी एकुणात आपल्या देशातील १०३ संस्थांचा समावेश आहे. आधीच्या वर्षी ही संख्या ७८ होती. महत्त्वाचे म्हणजे, सर्वाधिक विद्यापीठांचा समावेश असणाऱ्या देशांत भारताचे स्थान चौथे आहे.

जगभरातील विद्यापीठे आपल्या विद्यार्थ्यांना जागतिक हवामान बदल, सामाजिक न्याय, जगापुढील आव्हाने यांविषयी सजग करत आहेत का, या विद्यापीठांत होणारे संशोधन शाश्वतता आणि त्यासाठीची जागतिक उद्दिष्टे यांना पूरक भूमिका बजावत आहे का, प्रशासकीय कारभार, सामाजिक समावेशन, दीर्घकालीन नियोजन अशा आघाड्यांवर विद्यापीठे जबाबदारीने आणि नैतिकदृष्ट्या योग्य कार्य करत आहेत का, तेथून शिक्षण घेतलेले विद्यार्थी त्याचे अनुसरण करून आपले भवितव्य जबाबदारीने साकारत आहेत का, अशा अनेक मुद्द्यांची दखल या मानांकनांसाठी घेतली गेली आहे.

'क्यूएस'मध्ये भारत

भारतासाठी ही यादी आणि त्याहीपेक्षा महत्त्वाचे म्हणजे भारतीय विद्यापीठांची शाश्वततेच्या निकषांवरील कामगिरी ही त्यांची प्रतिमा किंवा शिक्षण क्षेत्रातील त्याचे परिणाम यांपेक्षाही अधिक व्यापक कारणांसाठी महत्त्वाची आहे. देश म्हणून विकासित होण्याच्या उंबरठ्यावर आपण निवडण्याचे पर्याय, जागतिक हवामान बदल रोखण्यासाठीच्या प्रयत्नांना त्यातून लावायचा हातभार आणि एक जबाबदार देश म्हणून स्वातंत्र्याच्या शताब्दीकडे करण्याची वाटचाल ही ती कारणे आहेत.

यंदाच्या या मानांकन यादीत आधीच्या वर्षाच्या तुलनेत भारतातील ३२ टक्के नव्या विद्यापीठांची भर पडली, हे उल्लेखनीय! दिल्लीची आयआयटी या यादीतील अग्रक्रमी असणारी भारतीय संस्था असली तरी तिचे मानांकन गेल्या वर्षीच्या १७१वरून २०५पर्यंत खाली घसरले आहे. त्यामुळे यंदा या यादीत पहिल्या दोनशे स्थानांमध्ये भारताला स्थान मिळालेले नाही.

एकीकडे भारताने जनसांख्यिकीयदृष्ट्या जगातील सर्वाधिक तरुणांचा देश म्हणून ओळख प्रस्थापित केली आहे. दुसरीकडे, कालानुरूप आवश्यक तंत्रक्षमता आणि ज्ञानकौशल्यांमुळेही भारतीय तरुणांना जगभरातील दरवाजे खुले होत आहेत. या पार्श्वभूमीवर, जगापुढील सर्वाधिक महत्त्वाच्या आणि जटिल अशा हवामान बदल आणि शाश्वत विकासाच्या विषयाबाबत ते अनभिज्ञ राहिलेले त्यांच्याच भवितव्यासाठी योग्य राहणार नाही.

याची ठळक कारणे अशी :

बदलती पर्यावरणीय व सामाजिक परिस्थिती : जागतिक तापमानवाढीचे परिणाम आपण भोगत असताना विद्यापीठांनी या नव्या आव्हानांचा मुकाबला करू शकणारे तंत्रज्ञ, संशोधक, धोरणकर्ते आणि नेते घडवण्याचीही गरज आहे.

रोजगारक्षमता आणि कालसुसंगतता : ईएसजी हा केवळ उद्योगसंस्थांचाच नव्हे, तर बदलत्या जगाचा मंत्र ठरत आहे. त्यामुळे शाश्वततेशी संबंधित क्षेत्रातील शिक्षण-प्रशिक्षण असणाऱ्यांना नोकरीच्या संधीही अधिक खुल्या होणार आहेत. संस्थात्मक उत्तरदायित्व आणि नेतृत्व : भारतीय शिक्षण संस्थांनी स्वतःला शाश्वततेनुरूप घडवले तर त्यांचा प्रभाव अधिक खोलवर आणि अधिक व्यापक होऊ शकतो. त्यातून देश म्हणून आपण पर्यावरणीय व सामाजिक उद्दिष्टांच्या दिशेने अधिक सुकरतेने वाटचाल करू शकतो.

# भक्ती आणि शक्ती यांचा सुरेख संगम : सनातन राष्ट्र शंखनाद महोत्सव

१३ डिसेंबर पासून दिल्लीतील भारत मंडपममध्ये ३ दिवशीय सनातन राष्ट्र शंखनाद महोत्सव सुरु होत आहे ज्यातील पहिल्या दोन दिवसांमध्ये उद्बोधनाची विविध सत्रे होणार आहेत. राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर भारतीय संस्कृतीचा प्रचार प्रसार करणारे नामवंत वक्ते, संत महंत, व्याख्याते, संघटनांचे प्रमुख, राजकीय नेते आपले उद्बोधक विचार या ठिकाणी मांडणार आहेत.

सनातन भारतीय संस्कृती ही पृथ्वीतलावरील सर्वात प्राचीन संस्कृती आहे. या संस्कृतीवर आजतागायत असंख्य आघात झाले. काही हजार वर्षांपूर्वी निर्माण झालेल्या पंथांनी प्रसाराच्या लालसेने नेहमीच भारतीय संस्कृतीला लक्ष्य केले. येथील पुरातन ग्रंथ संपदा, साहित्य नष्ट केले, येथील वैभव लुटले, संस्कृतीचे ऊर्जास्रोत असलेली मंदिरे फोडली, देवी देवतांच्या मूर्तींची विटंबना केली तलवारीच्या बळावर धर्मांतरे घडवून आणली, बाया बापड्यांच्या अब्रू लुटल्या, लोकांवर अनन्वित अत्याचार केले, त्यांना आपले गुलाम केले. येथील संस्कृतीशी ज्यांची नाळ घट्ट जोडली गेली होती त्यांनी प्रसंगी प्राण दिले मात्र आपल्या धर्माशी प्रतारणा केली नाही. त्यांच्या त्यागामुळे आणि निष्ठेमुळे स्वातंत्र्याची रसाळ फळे आपण आज चाखत आहोत. भारतात होऊन गेलेले ऋषी मुनी , त्यांनी केलेली दिव्य साधना आणि या साधनेतुन त्यांना मिळालेले ज्ञान त्यांनी ग्रंथ रूपाने मांडून ठेवले.

या ग्रंथांचे वाचन केल्यावर त्यातील ज्ञान आजही नूतन वाटते. विज्ञानाने गेल्या काही वर्षांत जे शोध लावले आहेत त्या शोधांचे मूळ या लिखाणांतून सापडते यावरून त्याकाळी ऋषी मुनींना मिळालेले ज्ञान किती प्रगल्भ आणि परिपूर्ण होते याची कल्पना करता येईल. भक्तांच्या रक्षणासाठी आणि अधर्माच्या नाशासाठी साक्षात भगवंताने अवतार घेतल्याची असंख्य उदाहरणे केवळ भारतभूमीतच सापडतात. त्यांच्या पाऊलखुणा आणि दाखले आजही पाहायला मिळतात. आपल्या प्रत्येकात परमात्म्याचा अंश आहे ज्याला आत्मा म्हणतात. साधना केल्याने भागवत्प्राप्ती होते म्हणजेच आपल्यातील आत्म्याचे परमात्म्याशी मिलन होते ज्याला अध्यात्मिक भाषेत मोक्ष असेही म्हटले जाते. मानवी जन्म हा भगवंताने त्यासाठीच दिला आहे हा सिद्धांत केवळ सनातन हिंदू धर्मच मांडतो. व्यक्ती तितक्या प्रकृती तितके साधनामार्ग आपल्याकडे आहेत म्हणजेच प्रत्येकाच्या प्रकृतीला अनुसरून इथे साधनामार्ग आहेत. कुणी कोणतीही साधना करावी




सर्वांचा शेवट त्या परमात्म्यापाशीच होतो. रामराज्य हे सर्वात आदर्श राज्य मानले जाते. भारतात पुन्हा रामराज्य आणायचे असेल तर आधी प्रत्येकाने स्वतःमध्ये रामराज्याची स्थापना करायला हवी अर्थात ती केवळ अध्यात्मिक साधनेनेच होऊ शकते. अध्यात्माच्या विविध अंगांची ओळख करून देणारी विविध व्याख्याने दिल्लीतील शंखनाद महोत्सवात होणार आहेत त्यामुळे यानिमित्ताने भक्तीच्या सागरात डुंबण्याचे भाग्य उपस्थितांना लाभणार आहे.

भगवंताची प्राप्ती ही जीवनाचे ध्येय असले तरी भगवंताच्या विविध अंगांशी एकरूप झाल्याशिवाय ते साध्य होणार नाही. देवतांचा एक हात आशीर्वाद देणारा असला, तरी अन्य हातात शस्त्रे आहेत आणि त्या शास्त्रांचा वापर त्यांनी वेळोवेळी केला आहे. त्यामुळे सांप्रत काळात क्षात्रधर्म साधनाही महत्वाची आहे आणि ती करण्यासाठी स्वतःजवळ शारीरिक आणि मानसिक बळ असणेही गरजेचे आहे. नियमित व्यायाम आणि स्वरक्षण प्रशिक्षण त्यासाठी अनिवार्य आहे. भारताला जसा अध्यात्माचा गाभा लाभला आहे तसा शौर्याचा वारसाही लाभला आहे. चालून आलेल्या शत्रूशी कधी दोन हात करून, तर कधी युक्तीच्या बळावर नेस्तनाबूत केल्याची असंख्य उदाहरणे इतिहासात सापडतात. छत्रपती शिवाजी महाराजांनी मूठभर मावळ्यांना सोबत घेऊन पाच पातशाह्यांना धूळ चारली आणि हिंदवी स्वराज्याची स्थापना केली ती त्यांच्यातील अफाट बुध्दीचातुर्यांच्या आणि युद्धकौशल्याच्या बळावर. भारतीय संस्कृतीवरील आक्रमणे आजही थांबलेली नाहीत. आज कोणीही उठतो आणि देवी देवतांची, आस्थांची, इतिहासपुरुषांची टिंगलटवाळी करतो. सिनेमा, वेब सिरीज, नाटके, मालिका, जाहिराती आदींच्या माध्यमातून पौराणिक आणि ऐतिहासिक प्रसंगांना, त्यातील व्यक्तिरेखांना व्यंगात्मक स्वरूपात दाखवले जाते अशांना वेळीच रोखणे गरजेचे आहे. विविध प्रकारचे जिहाद आजही आपल्या संस्कृतीवर आक्रमणे करत आहेत, नक्षलवाद आज जंगलापेक्षा शहरी भागात झपाट्याने फोफावतो आहे. प्रांतीय भाषांना सोडून पालक आपल्या मुलांना कॉन्व्हेंट आणि इंग्रजी माध्यमांच्या शाळांमध्ये घालू लागल्याने पाश्च्यात्य संस्कृती जोरदार फोफावू लागली आहे.

आदिवासी आणि गरीब वस्त्यांमधे आजही धर्मांतराचे जाळे पसरलेले पाहायला मिळते. अशी अनेक प्रकारची संकटे सनातन भारतीय संस्कृतीवर विविध बाजूंनी आघात करत आहेत, त्यांना विरोध करण्यासाठी पुन्हा एकदा शौर्याची उपासना करणे गरजेचे बनले आहे. सनातन शंखनाद महोत्सवात शौर्याचाही जागर होणार आहे. भारतभरात होऊन गेलेले राजे महाराजे, क्रांतिकारक यांनी वापरलेली शस्त्रे, शिरस्त्राणे, चिलखती, भाले, कट्यार, बिछवे, दांडपट्टे, तलवारी, तोफ यांचे भव्य प्रदर्शन या ठिकाणी भरवण्यात येणार आहे. या शस्त्रांचा वापर कशाप्रकारे केला जात असे हे प्रत्यक्षात दाखवण्यात येणार आहे. यासोबतच स्वसंरक्षणाचे महत्व सांगणारी व्याखाने आणि प्रात्यक्षिके उपस्थितांचे स्फुल्लिंग चेतवणार आहेत. भक्ती आणि शक्ती यांचा सुरेख मेळ साधणारा देशाच्या राजधानी दिल्लीतील सनातन राष्ट्र शंखनाद महोत्सव भारतीय संस्कृतीचे महत्व पुन्हा एकदा जनमनसांत पोहोचवणारा ठरणार आहे.

**- सौ. मोक्षदा घाणेकर,**
**काळाचौकी, मुंबई**

## नाद विठ्ठल

वारकऱ्यांची सावली ।
विठोबा माझी माउली ।। १

दिंडी आली दारावरी ।
ज्ञाना तुका वारकरी ।। २

विठोबा म्हणे, रुख्मिणी ।
सजवं रांगोळी दारी ।। ३

हाच दिवाळी दसरा ।
भक्तासंगे गं साजरा ।। ४

धागेनाताँ ऽक्डधिन ।
टाळांची टिंण्टीण छान ।। ५

बघ मृदुंगाची धून ।
तो गं विणेचा झंन्कार ।। ६

नाचू किती गं रुख्मिणी ! ।
पाय थांबतच नाही ! ।। ७

जयजय विठोब्बा रखुमाई ।
गर्जे अवघे पंढरपुरी ।। ८

काय सुखाचा सोहळा ! ।
मनवा हृदयी दाटला ! ।। ९

माझे माहेर पंढरी ।
आहे भिवरेच्या तिरी ।। १०

विठ्ठल पांडुरंग हरी ।
नाद घुमला पंढरी ।। ११

**- रचनाकार : संगीत महामहोपाध्याय स्वरचैतन्य डॉ.मिलिंद इंदूरकर (मनवा) नागपूर**

# संविधानाचा अभ्यासक्रमात समावेश होणे ही काळाची गरज

नुकताच २६ नोव्हेंबरला संपूर्ण देशात संविधानाचा अमृत महोत्सव साजरा करण्यात आला. अमृत महोत्सवी संविधान दिना निमित्त संपूर्ण देशात संविधानाचा जागर करण्यात आला. ठिकठिकाणी विविध उपक्रमांद्वारे संविधानाचे महत्व अधोरेखित करणारे कार्यक्रम, उपक्रम राबवण्यात आले मात्र संविधान दिन हा फक्त एक दिवसाचा सोहळा ठरता कामा नये वास्तविक संपूर्ण वर्षभर संविधानाचा जागर व्हायला हवा. दौंड मधील 'आम्ही भारताचे लोक' ही सामाजिक संघटना वर्षभर म्हणजे वर्षातील ३६५ दिवस संविधानाचा जागर करते. संविधानाच्या एका कलमा वर दररोज विस्तृत चर्चा केली जाते. संविधानाने दिलेले हक्क आणि अधिकार सर्वसामान्य नागरिकांपर्यंत पोहचवण्याचे काम ही संघटना करते. या संघटनेच्या या कार्याचे खरोखरच कौतुक व्हायला हवे. आम्ही भारताचे लोक संघटनांसारख्या वर्षभर संविधानाचा जागर करणाऱ्या संघटना अतिशय कमी आहेत म्हणूनच नागरिकांमध्ये संविधानाबाबत अद्यापही म्हणावी तशी जागृती होऊ शकली नाही. संविधान लागू होऊन आज ७६ वर्ष उलटली तरी नागरिकांना आपले हक्क आणि अधिकार माहीत नाहीत म्हणूनच संविधानाचा अभ्यासक्रमात समावेश करण्याची वेळ आली आहे. संविधानाचा अभ्यासक्रमात समावेश करावा ही खूप जुनी मागणी आहे मात्र त्याला अद्यापही म्हणावा तसा प्रतिसाद मिळत नाही. नाही म्हणायला सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या कला, विज्ञान आणि वाणिज्य शाखेच्या पदवीचे शिक्षण घेणाऱ्या द्वितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांना दोन श्रेयांकाचा,( क्रेडिट कोर्स) शिकवला जात आहे मात्र हा कोर्स घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या त्यामानाने खूप कमी आहे म्हणूनच संविधान हा विषय शालेय अभ्यासक्रमात समाविष्ट करावा. आज आपल्या देशात लाखो विद्यार्थी पदवीधर होतात पण आपल्या संविधानाचा अभ्यास अतिशय कमी विद्यार्थ्यांना असतो. उच्च शिक्षित असूनही संविधानाची जुजबी माहितीही विद्यार्थ्यांना नसते. शालेय अभ्यासक्रमात नागरिकशास्त्र हा विषय शिकवला जातो तो पण त्रोटक स्वरूपात शिकवला जातो त्यात संविधानाची माहिती नसते. स्थानिक स्वराज्य संस्था, त्यांचे कार्य - अधिकार, निवडणूक, लोकसभा, राज्यसभा, विधानसभा, विधानपरिषद, लोकप्रतिनिधींनिंची जबाबदारी, अधिकार अशा स्वरूपाचीच माहिती नागरिक शास्त्रात पाहायला मिळते त्यामुळे संविधानाबाबत उच्च शिक्षित विद्यार्थी अज्ञानीच असतात. त्यांचे हे अज्ञान दूर होण्यासाठी संविधानाचा अभ्यासक्रमात समावेश होणे गरजेचे आहे. भारतीय संविधानात नागरिकांचे मूलभूत हक्क, कर्तव्य, अधिकार यांचा समावेश आहेच पण देशाचा आदर्श कारभार कसा करावा याचेही नियम आहेत. समता, बंधुता यांचीही शिकवण संविधानात आहे. संविधानामुळेच देश अखंड आहे. संविधान हा लोकशाहीचा पाया आहे. संविधान हा आपल्या जीवनाचा अविभाज्य घटक आहे. संविधान आपला राष्ट्रीय ग्रंथ आहे. भारताचे संविधान शालेय स्तरावरच विद्यार्थ्यांच्या मनावर बिंबवले तर राज्याच्या आणि राष्ट्राच्या उभारणीत ते योग्य दिशेने आपापल्या क्षेत्रात कार्य करू शकतील म्हणूनच हा विषय अभ्यासक्रमात समाविष्ट होणे ही काळाची गरज आहे.

**- श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

# गांवगाड्यातील सत्ताकेंद्र अडकले भ्रष्टाचाराच्या विळख्यात...

राष्ट्रपिता महात्मा गांधी यांनी नारा दिला होता की खेड्यांकडे चला ज्याचा अर्थ भारताचे खरे स्वरूप खेड्यांमध्ये आहे ग्रामीण भागाच्या समृद्धीसाठी आणि सक्षमीकरणासाठी मार्गदर्शक असल्याने गावगाड्यातील प्रमुख सत्ताकेंद्र म्हणून ग्राम पंचायतीकडे पाहिले जाते विकासाचे माध्यम म्हणून ग्रामपंचायतीला खूप अधिकार दिले आहेत ग्रामीण भागाला उभारी द्यायचे असेल तर ग्रामपंचायत ताब्यात असणे महत्वाचे असते मात्र सद्या ग्राम पंचायतमधील अपप्रवृत्ती बळावत चालल्याने ग्राम पंचायतींची प्रतिमा मलिन होत असून राजकारणाची दिशा बदलत आहे राज्यातील ग्रामपंचायतींचा कालावधी डिसेंबरला संपुष्टात येतं असल्याचे राजकीय वर्तुळातून बोलले जात आहे त्यांचं अनुषंगाने अनेक ठिकाणी सत्ता संघर्ष उफाळून येत आहेत तर काही ठिकाणी वर्चस्ववादातून आणि टोकाच्या इर्षेतून हकनाक बळी पडले आहेत ग्रामपंचायत मधील भ्रष्टाचारावरुन सत्ताधारी व विरोधक यांच्यामध्ये आरोप प्रत्यारोपांच्या फैरी झडत आहेत, एकमेकांची उणीदुणी काढण्यातचं धन्यता मानत आहेत तर काहिजन पत्रकबाजी, डिजिटल फ्लेक्स, विविध सोशल मिडियाद्वारे आम्ही किती स्वच्छ आहोत हे मतदारांना दाखवून देत आहेत मात्र हा सर्व खेळ खुर्चीसाठी सुरु असल्याचे जनतेच्या लक्षात आले आहे. कुणाला वेळ आहे असले पत्रक आणि डिजिटल बोर्ड वाचायला, एकमात्र यामुळे फक्त करमणूक होते आहे निष्पन्न मात्र काहीचं नाही राजकारणामध्ये स्थानिक स्वराज्य संस्थेला अर्थात ग्राम पंचायतीला खूप महत्व आहे भारत सरकारने ग्राम पंचायतीला खूप अधिकार दिले आहेत मात्र त्याचा वापर योग्य होताना दिसत नाही सर्वसामान्य जनता आपल्या प्रभागातील समस्यांचा निपटारा व्हावा, आपल्या मूलभूत गरजा पूर्ण व्हायला हव्यात यासाठी आपला बुलंद आवाज म्हणून दर पाच वर्षांनी सदस्यांना निवडून देते मात्र निवडून गेल्यानंतर वेगळेच चित्र पहायला मिळते हे आपले दुर्दैव म्हणावे लागेल !

- राजू जाधव, मांगूर
जि. बेळगांव

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

## थोडक्यात

### कोकण ९६ कुळी मराठा प्रतिष्ठान वतीने विद्यार्थी गुणगौरव आणि समाज गौरव सोहळ्याचे आयोजन

**अक्षराज : उदय दणदणे**

**दि.१२, ठाणे :** गेली सहा वर्षे सामाजिक पटलावर समाजाभिमुख उपक्रम राबविण्यात अग्रेसर असलेल्या कोकण ९६ कुळी मराठा प्रतिष्ठान मुंबई /ठाणे वतीने रविवार दिनांक २१ डिसेंबर २०२५ रोजी दुपारी ०३ ते ०९ ह्या वेळ मर्यादित,आर्य क्रीडा मंडळ,गावदेवी मैदान जवळ, नौपाडा, ठाणे -(पश्चिम) येथे समाजातील गुणवंत विद्यार्थी यांचा गुणगौरव तसेच समाजातील विविध क्षेत्रात प्राविण्य मिळविलेल्या समाज बांधव/भगिनीं यांचा समाज गौरव सोहळा आयोजित करण्यात आला असून प्रतिष्ठानचा मानाचा समजला जाणारा समाज भूषण पुरस्कार २०२५ ने गौरविण्यात येणार आहे. त्याचबरोबर दिनदर्शिका-२०२६ चे प्रकाशन व महिलांसाठी हळदी कुंकू समारंभाचे आयोजन करण्यात आले आहे असल्याची माहिती कोकण ९६ कुळी मराठा प्रतिष्ठानचे अध्यक्ष सुनिल (बापू) मोरे यांनी दिली. ालुका शाखा गुहागर अध्यक्ष सुधाकर मास्कर यांनी केले आहे.

सदर पार पडलेल्या सभेला गुहागर तालुका शाखा अध्यक्ष सुधाकर मास्कर, उपाध्यक्ष प्रमोद घुमे, सहसचिव सुधीर टाणकर, खजिनदार उदय दणदणे, सदस्य: दीपक वेलुंडे, जनार्दन आंबेकर, प्रशांत भेकरे, शांताराम शिंदे, अमित काताळे त्याचबरोबर प्रवीण बारगोडे तसेच गुहागर तालुक्यातील अनेक गाव मंडळ, प्रतिनिधी, कलाकार मोठ्या संख्येने उपस्थित होते. सदर सभेला दुर्गादेवी देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष किरण खरे यांचे मोलाचे योगदान लाभले.

### मंद्रूपच्या अस्वच्छतेबाबत झेडपी सीईओ जंगम यांची नाराजी

**अक्षराज : शिवराज मुगळे**


गौरवपत्र
मंद्रूप ग्रामपंचायत, महाराष्ट्र
(थिमॅटिक क्षेत्र:भूमी)
यांचा माझी वसुंधरा अभियानांतर्गत केलेल्या उल्लेखनीय कामगिरीबद्दल
IFAT India
या व्यासपीठावर गौरव करण्यात येत आहे.
दिनांक: १४ ऑक्टोबर २०२५
पर्यावरण आणि वातावरणीय बदल विभाग, महाराष्ट्र शासन
आणि
अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था, मुंबई
(महाराष्ट्र वॉश एन्वायर्नमेंटल सॅनिटेशन कोएलिशन)
उत्कर्षा कवडी
अभिजित घोरपडे
सुधाकर बोबडे

**दि.१२, सोलापूर :** दक्षिण सोलापूर तालुक्यातील मंद्रूप येथील बस स्थानकादरम्यान असलेल्या घाणीच्या साम्राज्याबद्दल जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांनी नाराजी व्यक्त केली आहे.

दक्षिण सोलापुरात सीना भीमा नदीच्या खोऱ्यात मोठी बाजारपेठ असलेल्या मंद्रूप गावचे नागरीकरण वाढत आहे. मंद्रूप मोहोळ बायपास महामार्गावर लोकसेवा हायस्कूल ते जोडमोटेवस्ती आणि विठाई नगर ते माळकवटे फाटा यादरम्यान व्यापारी पेठ वाढत चालली आहे. मंद्रूप तांडा ते बसस्थानक दरम्यान दुकाने वाढली आहेत. अशा स्थितीत बस स्थानक ते ग्रामीण रुग्णालय पर्यंत रस्त्याच्या दुतर्फा घाणीचे साम्राज्य वाढत चालले आहे. या मार्गावरून येणाऱ्या जाणाऱ्यांना या घाणीचे दर्शन होते. तर मंद्रूप सारख्या मोठ्या जनावरांच्या बाजारपेठेमध्ये अतिशय घाणीचा साम्राज्य दिसून येते.

ही बाब मंद्रूपकरांसाठी भूषणावह नाही. जिल्हा परिषद मराठी शाळा ते बसस्थानक दरम्यान तर विखुरलेला कचरा यामुळे गावाच्या सौंदर्याला बाधा येत आहे. व बाजार पेठेमधून मुख्य रस्त्यावर नेहमी कधी पाणी वाहताना तर कधी चिखलमल असते ग्रामपंचायत प्रशासनाने स्वच्छता मोहीम राबवली तरी या परिसरातील नागरिकांनी स्वयंशिस्त लावून घेणे गरजेचे झाले आहे. या दरम्यान असणाऱ्या दुकान मालकांना स्वच्छतेबाबत आणखी जागरूक करणे गरजेचे झाले आहे. कचरा संकलित करण्यासाठी नागरिकांना उद्युक्त करणे गरजेचे झाले आहे. माझी वसुंधरा या कार्यक्रमात राज्यात प्रथम आलेल्या गावाचे ही अवस्था असेल तर नागरिकांनी याबाबत गांभीर्याने विचार करणे गरजेचे झाले आहे. सार्वजनिक ठिकाणी अस्वच्छता करणाऱ्यांना शिस्त लावण्याची गरज निर्माण झाली आहे. सरपंच आणि ग्रामविकास अधिकाऱ्यांनी या बाबीकडे गांभीर्याने पाहणे गरजेचे असल्याचे मत जंगम यांनी व्यक्त केले आहे.

### नाशिकमध्ये बनतोय देशातील दुसरा सर्वात लांब एक्सप्रेसवे

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१२, नाशिक :** देशातील सहा राज्यांना जोडून सुरत-चेन्नई ग्रीनफील्ड एक्सप्रेसवे उभारण्यात येत आहे. या कॉरिडोरचा अत्यंत महत्त्वाचा भाग म्हणजे नाशिक-चेन्नई दृतगती मार्ग. सूरतवरून चेन्नईला जोडणारा हा दृतगती मार्ग नाशिकमधून जात असल्यामुळे शहरात सहा पदरी एक्सप्रेसवे उभारला जाणार आहे.

दोन प्रमुख बंदरांना जोडणी

हा दृतगती मार्ग नाशिकमधून सुरू होऊन पुढे पालघर जिल्ह्यातील वाढवण बंदराशी थेट जोडला जाणार आहे. त्यामुळे नाशिककरांना महाराष्ट्रातील वाढवण बंदर आणि दक्षिण भारतातील चेन्नई बंदर या दोन्ही महत्त्वाच्या सागरी मार्गांशी सहज व द्रुत जोडणी मिळणार आहे. वाढवण ते चेन्नई ही दोन महत्त्वाची बंदरे या एक्सप्रेसवेमुळे प्रथमच थेट जोडली जाणार आहेत. या प्रकल्पाचे काम दोन प्रमुख टप्प्यांत विभागलेले आहे. पहिला टप्पा अक्कलकोटपर्यंत असून ३७४ किमी लांबीच्या सहा पदरी दृतगती मार्गाचा समावेश आहे. सध्या नाशिक-ते-अक्कलकोट हे अंतर साधारण ५२४ किमी असून, या प्रवासासाठी जवळपास ९ तास लागतात. नव्या मार्गामुळे हे अंतर तब्बल १५० किमीने कमी होणार असून, प्रवासाचा वेळही निम्म्यावर येत अवघ्या ४ तासांमध्ये पूर्ण होणार आहे. हा संपूर्ण प्रकल्प इजढ तत्वावर विकसित केला जात आहे.

***सहा राज्यांना जोडणार...**

सुरत-चेन्नई दृतगती मार्ग देशातील सहा राज्यांना जोडणार आहे. त्यात गुजरात, महाराष्ट्र, कर्नाटक, तेलंगणा, आंध्र प्रदेश आणि तामिळनाडूचा समावेश आहे. दिल्ली-मुंबई दृतगती मार्गानंतर हा देशातील दुसरा सर्वात लांब दृतगती मार्ग ठरणार आहे. नाशिकवरून चेन्नईच्या दिशेने जाताना हा मार्ग थेट आंध्र प्रदेशात प्रवेश करणार असून, तिरुपती या महत्त्वाच्या धार्मिक स्थळाला थेट जोडणी मिळणार आहे. पूर्वी जिथे प्रवासाला २२ ते २३ तास लागत होते, तोच प्रवास आता केवळ १२ तासांत पूर्ण होणार आहे.

नाशिकमध्ये हा मार्ग मुंबई-आग्रा महामार्गाला आडगाव येथील ट्रक टर्मिनलवरून थेट जोडला जाईल. तसेच गोंदे-दुमाला येथे तवा नाशिक एक्सप्रेसवेशी हा मार्ग जोडला जाणार असून, याच जोडणीद्वारे वाढवण बंदरापर्यंत थेट प्रवेश मिळेल. सिन्नर तालुक्यातील वावी येथून हा मार्ग समृद्धी महामार्गालाही जोडला जाणार आहे. नाशिक जिल्ह्यातील सहा तालुके आणि सुमारे ७० गावांमधून हा दृतगती मार्ग जाणार असून, यासाठी अंदाजे १९५ हेक्टर भूसंपादन करण्यात येणार आहे. मार्गावरील प्रमुख शहरांमध्ये नाशिक, अहिल्यानगर, सोलापूर, अक्कलकोट, कलबुर्गी, कर्नूल, कडप्पा, तिरुपती आणि चेन्नई या शहरांचा समावेश आहे.

## ३० जानेवारीपासून अण्णा हजारेंचा पुन्हा उपोषणाचा इशारा

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.१२, अहिल्यानगर :** ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांनी लोक आयुक्त विधेयकासाठी पुन्हा एकदा उपोषणाचा इशारा दिला आहे. अण्णा हजारे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र लिहून थेट तारीखच मान्य केली आहे. विधानसभा अन् विधान परिषदेत विधेयक मंजूर जाल्यानंतरही अद्याप अंमलबजावणी झाली नाही. त्यामुळे अण्णा हजारे यांनी उपोषणाला बसण्याचा निर्णय घेतला आहे.



अण्णा हजारे यांनी देवेंद्र फडणवीस यांना पत्र पाठवत लोक आयुक्त विधेयकाच्या अंमलबजावणीसाठी उपोषण करणार असल्याची माहिती दिली. लोकायुक्त कायद्याच्या अंमलबजावणीसाठी अण्णा हजारे पुन्हा आमरण उपोषण करणार आहेत. ३० जानेवारी २०२६ पासून अहिल्यानगरमधील राळेगणसिद्धी येथील यादव बाबा मंदिरामध्ये अण्णा हजारे उपोषण करणार आहेत.

२८ डिसेंबर २०२२ रोजी विधानसभेत आणि १५ डिसेंबर २०२३ रोजी विधानपरिषदेत विधेयक मंजूर झाले आहे. तरीही अद्याप याची अंमलबजावणी होत नाही. त्यामुळे अण्णा हजारे यांनी उपोषण करण्याचा निर्णय घेतला आहे. विधेयक मंजूर होऊन दोन वर्षाचा कालावधी उलटून गेला. अंमलबजावणी करण्याची सरकारची इच्छा दिसत नाही, त्यामुळे उपोषण करणार असल्याचे अण्णा हजारे यांनी पत्रात म्हटलेय.

राज्यात सशक्त लोकायुक्त कायदा करावा यासाठी २३ मार्च २०१८ रोजी दिल्लीच्या रामलीला मैदानावर सात दिवसांचे उपोषण करण्यात आले आणि त्यानंतर ३० जानेवारी २०१९ रोजी राळेगणसिद्धीच्या यादवबाबा मंदिरात सात दिवसांचे उपोषण करण्यात आले होते. त्यानंतर आपण कायदा करण्यासाठी राज्याच्या मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली शासनाचे पाच सदस्य आणि सिव्हिल सोसायटीचे पाच सदस्य अशी संयुक्त मसुदा समिती स्थापन करून सदर समित्याच्या ९ बैठका घेऊन लोकायुक्त कायद्याचा मसुदा तयार करण्यात आला.

२८ डिसेंबर २०२२ रोजी राज्याच्या विधानसभेच्या हिवाळी अधिवेशनात महाराष्ट्र लोकायुक्त विधेयक विधानसभेमध्ये मंजूर करण्यात आले. त्यानंतर १५ डिसेंबर २०२३ रोजी राज्याच्या विधानसभेच्या हिवाळी अधिवेशनात महाराष्ट्र लोकायुक्त विधेयक मंजूर करण्यात आले. २० डिसेंबर २०२४ रोजीच्या आपल्या पत्रात सदर लोकायुक्त विधेयकास राज्यपाल मोहोदयांनी मान्यता दिली आहे आणि सदर विधेयक मा. राष्ट्रपती महोदयांच्या मंजुरीसाठी केंद्र शासनाकडे पाठविण्यात आले असून त्यासाठी आवश्यक पाठपुरावा शासन करत आहे असे पत्रात नमूद केले आहे. परंतु आपण पाठवलेल्या पत्राला एक वर्षा पेक्षा अधिक कालावधी आणि कायदा विधान परिषदेमध्ये मंजूर होऊन दोन वर्षाचा कालावधी झाला आहे. मात्र अद्यापही राज्यात सशक्त लोकायुक्त कायद्याची अंमलबजावणी झालेली नाही.

> हा काही माझा वैयक्तिक प्रश्न नाही. देशातील जनतेचा प्रश्न आहे. देशातील भ्रष्टाचाराला रोखण्याचा प्रश्न आहे. एवढा प्रदीर्घ काळ झाल्यानंतरही लोकायुक्त कायद्याची अंमलबजावणी होत नाही, यावरून हे स्पष्ट होते की,राज्यात लोकायुक्त कायद्याची अंमलबजावणी करण्याची सरकारची इच्छा दिसत नाही. त्यामुळे मी विचार केला की, हार्ट अटॅकने मृत्यू येण्यापेक्षा देश आणि समाजाच्या हितासाठी मृत्यू आला तर ते माझे भाग्य समजेन, म्हणून आपणास स्मरण करून देत आहे की आपल्या सरकारने दिलेल्या आश्वासनानुसार लोकायुक्त कायद्याची अंमलबजावणी झाली नाही तर महात्मा गांधीजींच्या अहिंसात्मक मार्गाने मी राळेगणसिद्धी येथिल संत यादवबाबा मंदिरामध्ये दि. ३० जानेवारी २०२६ पासून पुन्हा माझे आमरण उपोषण सुरू करीत आहे.

## सिंगापूर, जर्मनी, एस्टोनिया देशांतील विद्यार्थ्यांची नवी मुंबई महानगरपालिकेस अभ्यास भेट

**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.११, नवी मुंबई :** नवी मुंबई शहराची ओळख आधुनिक शहर म्हणून सर्वदूर असून अनेक देशी- परदेशी अभ्यासक, विद्यार्थी नवी मुंबई शहराला भेटी देऊन नवी मुंबईतील नाविन्यपूर्ण प्रकल्प, उपक्रम यांची माहिती घेत असतात. अशाच प्रकारे आज सिंगापूर मॅनेजमेंट युनिव्हर्सिटीच्या विद्यार्थी समुहाने नवी मुंबई महानगरपालिका मुख्यालयास भेट देऊन विविध प्रकल्प, कामांची माहिती व त्यामधील वेगळेपण जाणून घेतले.

रिलायन्स फाऊंडेशन इन्स्टिट्यूट ऑफ एज्युकेशन ॲण्ड रिसर्च या शैक्षणिक संस्थेच्या माध्यमातून सिंगापूर मॅनेजमेंट युनिर्व्हसिटीच्या २० विद्यार्थी समुहाने आज नवी मुंबई महानगर पालिका मुख्यालयास भेट दिली. यावेळी महापालिका सचिव चित्रा बाविस्कर यांनी त्यांचे स्वागत केले.

यावेळी महापालिका सल्लागार समुहाने महानगरपालिका क्षेत्रातील वैशिष्ट्यपूर्ण प्रकल्पांची व उपक्रमांची माहिती संबंधित अभ्यासगटास दिली. यामध्ये पाणीपुरवठा व्यवस्थापन, मलनि:स्सारण व्यवस्थापन, घनकचरा संकलन व प्रक्रिया व्यवस्थापन, सांडपाण्याचा पुनर्वापर, दैनंदिन स्वच्छता. प्रदुषण प्रतिबंधात्मक कार्यवाही, स्वच्छताकर्मींना वेळोवेळी दिले जाणारे प्रोत्साहन, व्यसनमुक्तीसह जनजागृती, आरोग्य सेवा-सुविधा, बांधकाम - पाडकाम साहित्यापासून पेव्हर ब्लॉक तयार करणे, प्लास्टिकमुक्त शहरासाठी करण्यात येणाऱ्या उपाययोजना, वस्त्र कचऱ्यावरील पुनर्प्रक्रिया प्रकल्प - अशा विविध प्रकल्पांबरोबरच सुक्या कचऱ्यापासून वीज निर्मिती, ओल्या कचऱ्यापासून बायोगॅस अशा संभाव्य प्रकल्पांबाबत देखील तपशीलवार सादरीकरण करून माहिती देण्यात आली.



अशाचप्रकारे काल १० डिसेंबर रोजीही रायन इंटरनॅशनल स्कुल या शाळेच्या माध्यमातून जर्मनी आणि इस्टोनिया या दोन देशांतील ४० हून अधिक शालेय विद्यार्थ्यांनी नवी मुंबई महानगरपालिका मुख्यालयास भेट देऊन शहराच्या वैशिष्ट्यांची माहिती जाणून घेतली.

या तिन्ही देशांतील महाविद्यालयीन व शालेय विद्यार्थ्यांच्या अभ्यासगटांनी भारतातील शहरांमध्ये जाणवणारे नवी मुंबईचे वेगळेपण अधोरेखित केले असून अनेक वेगळ्या गोष्टी अनुभवता आल्या अशी प्रतिक्रिया व्यक्त केली आहे.

## वरसई हायस्कूलमध्ये सहविचार सभेला माजी विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**अक्षराज : मितेश जाधव**

**दि.१२, पेण :** पेण एज्युकेशन सोसायटीची शाखा कै. पु.न . गोडसे विद्यामंदिर, वरसई, या विद्यालयाला ५० वर्षे पूर्ण होत असल्याने सुवर्ण महोत्सव रविवार दि.४ जाने २०२६ रोजी साजरा करावयाचा आहे.

सदर कार्यक्रमाची पूर्वतयारी, आणि नियोजन करण्यासाठी १९७५ ते २०२० या वर्षातील माजी विद्यार्थ्यांची सभा कै . पु.न गोडसे विद्यामंदिर ,वरसई येथे शुक्रवार सकाळीं ११ वाजता माजी विद्यार्थी सहविचार सभा आयोजित करण्यात आली होती या सभेत विविध विषयांवर चर्चा करून कार्यक्रमाचे कशा पद्धतीने नियोजन करावयाचे आहे या संदर्भात चर्चा करण्यात आली तसेच माजी विद्यार्थी यांनी सहविचार सभेला उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.




पेण एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष मंगेश नेने यांनी बोलताना सांगितले की कै. पु.न. गोडसे विद्यामंदिर, वरसई, या विद्यालयाला ५० वर्ष पूर्ण होत आहे त्यामुळे संस्थेच्या वतीने माजी विद्यार्थी समवेत सुवर्ण महोत्सव साजरा करणार आहोत या शाळेतील अनेक विद्यार्थी या शाळेतून विविध क्षेत्रात काम करत आहेत शाळेची जुनी आठवण व अनुभवले गुण या विषयी व शालेय संदर्भात आपण स्मरणिका (पुस्तकं) छापणार आहोत जर कोणाला शालेय जीवनातील आठवणी व काही लेख लिहायचे असतील तर आपण या स्मरणिका मध्ये छापणार आहोत तसेच या स्मरणिका मध्ये जाहिराती सुद्धा घेतली जाणार तरी शक्य असतील त्या माजी विद्यार्थ्यांनी देण्यासाठी प्रयत्न करून या सुवर्ण महोत्सव कार्यक्रमात जास्तीत जास्त माजी विद्यार्थिनी सहभागी व्हावे.

यावेळी पेण एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष अँड मंगेश नेने, सचिव सुधीर जोशी, संपर्क प्रमुख समीर साने, सदस्य डॉ.अँड नीता कदम, वरसई शाळेचे मुख्याध्यापक विनया पाटील, व माजी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## ज्ञानमाता झरी आश्रम शाळेचे विद्यार्थी प्रकल्प स्तरीय क्रीडा स्पर्धेत चमकले

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१२, पालघर :** महाराष्ट्र राज्य शासनाचा आदिवासी विकास विभागातंर्गत घेण्यात येणाऱ्या एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प डहाणू यांच्या क्रीडा स्पर्धा दिनांक ९ डिसेंबर ते १२ डिसेंबर शासकीय माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रम सवणे या ठिकाणी सन्माननीय विशाल खत्री (IAS) प्रकल्प अधिकारी तथा सहाय्यक जिल्हा अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली मोठ्या उत्साहात संपन्न झाल्या. ज्ञानमाता आदिवासी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे एकूण ७२ विद्यार्थी या स्पर्धेत सहभागी झाले होते. सर्वच विद्यार्थ्यांनी आपापल्या क्रीडा प्रकारात चुणूक दाखवली.

१४ वर्षाखालील मुलांच्या गटात ४*१०० रिले प्रकारात प्रथम क्रमांक, कबड्डीमध्ये प्रथम क्रमांक विद्यालयाच्या खेळाडूंनी मिळवला वैयक्तिक विद्या प्रकारात २०० मीटर धावणे व ४०० मीटर धावणे रोशन शैलेश बारगा यांनी प्रथम क्रमांक मिळवला. ४०० मीटर धावणे क्रीडा प्रकारात कपिल वसंत वळवी यांनीसुद्धा प्रथम क्रमांक मिळवला.




१४ वर्षाखालील मुलींच्या गटात कबड्डीत प्रथम व४*१०० रिलेत द्वितीय क्रमांक प्राप्त केला.

१७ वर्षाखालील मुलांनी कबड्डीत द्वितीय क्रमांक तर वैयक्तिक क्रीडा प्रकारात १५००धावण्याच्या स्पर्धेत प्रणव सुनील कुरकुटे प्रथम क्रमांक व ४०० मीटर धावण्यामध्ये स्वप्निल धर्मा मलवकर द्वितीय क्रमांक तर गोळा फेकमध्ये दिवेश विलास मेढा द्वितीय क्रमांक मिळविला.

१९ वर्षाखालील मुलांच्या गटात ४*१००रिलेत प्रथम क्रमांक तर वैयक्तिक क्रीडा प्रकारात किरण रमेश नाईक यांनी १०० मीटर धावणे द्वितीय क्रमांक व २०० मीटर धावणे क्रीडा प्रकारात प्रथम क्रमांक मिळवून सर्वांचेच लक्ष वेधून घेतले. याबरोबर अतुल दीपक धांगडा यांनी ४०० मीटर धावण्यात प्रथम क्रमांक तर निखिल विजय जनाथे यांनी १५०० मीटर धावण्याच्या स्पर्धेत प्रथम क्रमांक प्राप्त केला

१७ वर्षाखालील मुलींनी कबड्डीत द्वितीय क्रमांक आणि १९ वर्षाखालील मुलींच्या ४*१०० रिले स्पर्धेत प्रथम क्रमांक तर वैयक्तिक क्रीडा प्रकारात आरती लक्ष्मी वरखंडे हिने ३००० धावणे प्रथम क्रमांक व थाळीफेक मध्ये तेजल महादेव शिंगडा द्वितीय क्रमांक प्राप्त केला. विद्यालयाच्या क्रीडा यशाबद्दल संस्थेचे संचालक फादर निलम लॉपीस,शाळा संचालक फादर सेबी कोरिया, प्राचार्या सिस्टर बस्तियाना फर्नांडिस यांनी खेळाडूंचे भरभरून कौतुक केले आहे.

# पिंपरी-चिंचवडमधील बनावट सौंदर्यप्रसाधने प्रकरणावर कठोर कारवाई - अन्न व औषध प्रशासन मंत्री झिरवाळ

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१२, नागपूर :** पिंपरी-चिंचवडमध्ये बनावट सौंदर्यप्रसाधनांमुळे नागरिकांना त्वचेचे विकार झाल्याच्या गंभीर प्रकरणावर राज्य शासनाने कडक भूमिका घेतली आहे. अन्न व औषध प्रशासन विभागाने छाप्यात ३६ हजार ७०० रुपयांचा माल जप्त केला आहे. तपासानंतर प्रकरण पोलीसांकडे देण्यात आले असून विशेष चौकशी पथक नेमणार असल्याची माहिती अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ यांनी विधानसभेत दिली.



राज्यात औषध निरीक्षक मनुष्यबळाची कमतरता असून १.४५ लाख औषध दुकानांसाठी ४२ निरीक्षक कार्यरत आहेत. रिक्त पदे भरण्यासाठी १०९ उमेदवारांची नियुक्ती, तसेच ५६ निरीक्षक पदांचा निकाल मार्चपर्यंत अपेक्षित आहे. धायरी येथील एक आणि भिवंडी येथील एक अशा दोन कंपन्यांमधील तपासणी दरम्यान ₹१.१६ कोटींचा माल जप्त झाला असून त्यांच्यावर खटले दाखल करण्यात आले आहेत. उत्पादनाच्या मूळ स्रोतापर्यंत पोहोचून कठोर कारवाई करणार असल्याचेही मंत्री झिरवळ यांनी यावेळी सांगितले.

# सायखेडा येथील लक्ष्मी नारायण मंदिरात चोरी

## मौल्यवान ऐवज लंपास फिंगरप्रिंट व डॉग स्कॉडची तपासणी

**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.१२, विंचूर (नाशिक) :** निफाड तालुक्यातील शिवापूर, देवगाव, नैताळे पाठोपाठ आता सायखेडा येथील लक्ष्मी नारायण मंदिरातील मौल्यवान वस्तू अज्ञात चोरट्यांनी लंपास केल्याची घटना समोर आली आहे.

निफाड तालुक्यात देवस्थानांना लक्ष्य करण्याच्या सलग घटना घडत असल्याने नागरिकांच्या भावना दुखावल्या असून पोलिसांसमोर चोरट्यांनी मोठे आव्हान उभे केले आहे. फिर्यादी पुजारी सुमित जगदीश तिवारी वय ३८, रा.सायखेडा यांनी दिलेल्या फिर्यादीत, मंदिराच्या दरवाज्याची एक चावी माझ्याकडे असते व दुसरी चावी मंदिरासमोरील तटबंदीजवळील वीज वितरणच्या पेटीत ठेवलेली असते. दि.११ डिसेंबर २०२५




रोजी सकाळी ८ वाजता मी मंदिर उघडल्यावर मौल्यवान साहित्य चोरीस गेल्याचे लक्षात आले. त्याचबरोबर समोरील दुसरी चावी ठेवलेला वीज वितरणची पेटी उघडलेली व चावी खाली पडलेली दिसली. घटनेबाबत मी मंदीराचे आर्थिक खर्च पाहणारे श्रीनिवास काशीनाथ काबरा, रा.सायखेडा तसेच मंदिराचे वारसदार सर्वेश मालपाणी, रा. वावी आणि संतोष केला, रा.गांधीनगर, नाशिक रोड यांना विचारले असता, त्यांना काही माहिती नसल्याचे सांगितले.

अज्ञात चोरट्याने पेटीतील चावी वापरून मंदिराचे कुलूप उघडून दि.१० डिसें २०२५ रोजी सायं ६.३० वाजेपासून ते दि.११ डिसें २०२५ रोजी सकाळी आठ वाजेच्या दरम्यान आत प्रवेश केला. मंदिरातून २० ग्रॅम वजनाची २१०० रु.किमतीची चांदीची साखळी, ३५ ग्रॅम वजनाची ३५०० रु.किमतीची चांदीची पिंड, नऊ किलो वजनाचा ४,५०० रु.किमतीचा पितळी घंटा, १ हजार रु.किमतीची पितळी पंचारती तसेच देवीच्या मूर्तीवरील १ ग्रॅम सोन्याचे ९५०० रु.किमतीचे मणी मंगळसूत्र असा एकूण २०,६०० रू.किमतीचा ऐवज चोरून नेला असे म्हटले आहे. त्यांचे फिर्यादीवरून सायखेडा पोलिस ठाण्यात अज्ञात इसमाच्या विरोधात गु.र.नं. २३३/२०२५ भा.दं.वि. कलम ३०३ (२) व ३३१ (४) प्रमाणे गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

घटनेची माहिती मिळताच निफाड उपविभागीय पोलीस अधिकारी के. के. पाटील आणि स.पो.नि.संदीप घुगे यांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. फिंगरप्रिंट युनिट व डॉग स्कॉडने ही तपासणी केली असून पुढील तपास पो. हवा. अजय नाईक करीत आहेत.

# डहाणू प्रकल्पस्तरीय क्रीडा स्पर्धा उत्साहात संपन्न

**अक्षराज : निलेश कासट**

**दि.१२, तलासरी (पालघर) :** आदिवासी विकास विभागातर्फे आयोजित डहाणू प्रकल्पस्तरीय क्रीडा स्पर्धा सवणे येथील शासकीय माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रमशाळेच्या मैदानावर मोठ्या उत्साहात पार पडल्या. खेळाडूंच्या अफाट सहभागामुळे स्पर्धा रंगतदार झाली. एकूण ५४ शाळांमधील २२०० खेळाडूंनी १२०० मुले व १००० मुली १४, १७ आणि १९ वर्षे वयोगटांत उत्कटतेने सहभाग नोंदवला.

उद्घाटन प्रसंगी प्रकल्प अधिकारी तथा सहाय्यक जिल्हाधिकारी श्री. विशाल खत्री (भा.प्र.से) यांनी मार्गदर्शन केले. खेळाडूंना प्रेरणा देताना ते म्हणाले, जिद्द, मेहनत आणि सातत्यपूर्ण सराव तुम्हाला यशाच्या शिखरावर पोहोचवतो. विभागीय स्पर्धेत भक्कम कामगिरी करण्याची क्षमता तुमच्यात आहे. स्पर्धेचे प्रमुख पाहुणे म्हणून सुप्रसिद्ध जलतरणपटू शुभम वनमाळी यांनी हजेरी लावली. त्यांनी तरुण खेळाडूंशी संवाद साधत कठोर परिश्रम, निष्ठा आणि ध्येयाप्रती समर्पण यांचे महत्व पटवून सांगितले.

अंतिम निकालांमध्ये शासकीय माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रम शाळा, सवणे या केंद्राने विविध सांघिक व वैयक्तिक क्रीडा प्रकारांतील उत्तुंग कामगिरीच्या जोरावर सर्वसाधारण विजेतेपद पटकावले. मैदानावर खेळाडूंनी दाखवलेली स्पर्धात्मकता, शिस्त आणि ऊर्जा प्रेक्षकांचे लक्ष वेधून घेणारी ठरली.

स्पर्धेला यशस्वी करण्यासाठी प्रकल्पातील अधिकारी, प्रशिक्षक आणि पंचांची मोठी उपस्थिती लाभली. त्यात बनशीलाल पाटील (सहाय्यक प्रकल्प अधिकारी), अविनाश भुरकुड



(मुख्याध्यापक), योगेश खंदारे (कार्यालयीन अधीक्षक), जगदीश पाटील (संशोधन सहायक), यदुनाथ भोये (वरिष्ठ आदिवासी विकास निरीक्षक), श्रीराम आंधळे, अरुण शेटे, तसेच सर्व शिक्षण विस्तार अधिकारी, क्रीडाशिक्षक व प्रशिक्षकांचा विशेष सहभाग होता.

स्पर्धेचे सूत्रसंचालन प्रा.डॉ.विद्या शिंदे यांनी प्रभावीपणे पार पाडले. स्पर्धा सुरळीत आणि भव्य करण्यासाठी बनशीलाल पाटील (सहाय्यक प्रकल्प अधिकारी), सुधीर वनमाळी (क्रीडा प्रशिक्षक), अविनाश भुरकुड, विजय महाजन, श्रीकृष्ण पाटील, अमोल राऊत यांच्या परिश्रमांचे विशेष कौतुक करण्यात आले. डहाणू प्रकल्पातील क्रीडाभाव, शिस्त, उत्साह आणि प्रतिभेचा उत्कृष्ट संगम घडवणारा हा क्रीडा महोत्सव यशस्वीरीत्या संपन्न झाला. मैदानावरचा जोश, खेळाडूंची जिद्द आणि आयोजकांचे व्यवस्थापन यामुळे स्पर्धेने सर्वांच्या मनावर ठसा उमटवला.

# आगामी महापालिका निवडणूका महायुतीमध्येच लढणार

## उपमुख्यमंत्री शिंदे आणि भाजप प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांच्यात सविस्तर चर्चा

**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.१२, ठाणे :** राज्यातील आगामी महापालिका निवडणुका कोणत्याही क्षणी जाहीर होण्याची शक्यता असताना भाजप - शिवसेनेमध्ये यासाठी युती होणार की नाही याकडे इच्छुक उमेदवारांसह राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे. या महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राज्याचे उपमुख्यमंत्री आणि शिवसेनेचे मुख्य नेते एकनाथ शिंदे यांच्या नागपूर येथील निवासस्थानी भाजप प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांची काल रात्री बैठक झाली. त्यानंतर आज सकाळी भाजप प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी प्रसिद्धी माध्यमांशी संवाद साधताना महापालिका निवडणुका महायुतीमध्येच लढवण्यावर दोघांचे ही एकमत झाल्याचे सांगितले. नगरपालिका आणि नगरपरिषद निवडणुकांच्या काळामध्ये झालेल्या पक्ष प्रवेशाच्या मुद्द्यावरून शिवसेना भाजपमधील राजकीय संबंध चांगलेच ताणले गेले होते. ते पाहता राज्यातील महापालिका निवडणुका महायुतीतील हे दोन्ही पक्ष एकमेकांविरोधात लढवणार




असल्याचेच चित्र निर्माण झाले. मात्र गेल्या काही दिवसांत दोन्ही पक्षांतील या कडवट संबंधांची जागा आता पुन्हा एकदा मैत्रीपूर्ण भूमिकेने घेतल्याचे दिसत आहे. आणि या दोन्ही पक्षांनी महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर एकमताने महायुतीचे सूर आळवल्याचे दिसून येत आहे. या पार्श्वभूमीवर राज्याचे उपमुख्यमंत्री आणि शिवसेनेचे मुख्य नेते एकनाथ शिंदे आणि भाजप प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांच्यामध्ये काल रात्री मुंबईसह राज्यातील सर्व प्रमुख महापालिका निवडणुकीबाबत चर्चा झाली. ज्यामध्ये या सर्व महापालिका भाजप आणि शिवसेनेने महायुती म्हणून लढवाव्या अशी पक्षश्रेष्ठींसह सर्वांची इच्छा असल्याची माहिती भाजप प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी पत्रकार परिषदेत दिली.तसेच महापालिका निवडणुका लढवण्यासाठी महायुतीचा फॉर्म्युला कसा असावा यासाठी महापालिका स्तरावर स्थानिक प्रमुख पदाधिकाऱ्यांची स्वतंत्र कमिटी स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.या समित्या स्थानिक राजकीय समीकरणांचा अभ्यास करून, महायुतीचा योग्य फॉर्म्युला कसा असावा, जागावाटपाची दिशा काय असावी आणि स्थानिक स्तरावरील समन्वय कसा मजबूत करावा, यावर सविस्तर विचार करून त्यानुसार निर्णय घेण्यात येईल असे रविंद्र चव्हाण यांनी स्पष्ट केले. दरम्यान महापालिका निवडणुका महायुतीमध्येच लढवण्याच्या दृष्टीने वाटचाल सुरू झाल्याने दोन्ही पक्षांतील अनेक इच्छुक उमेदवार मात्र त्यामुळे हवालदिल झाले आहेत.

# सोमवारी 'महिला सक्षमीकरण व बचत गट उत्पादन मेळाव्याचे' आयोजन

**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.१२, पनवेल :** महापालिका क्षेत्रातील महिलांना स्वावलंबी व सशक्त बनवण्यासाठी , व्यवसायिक व सामाजिक कौशल्य वाढविण्यासाठी पनवेल महानगरपालिकेमार्फत महापालिका कार्यक्षेत्रातील महिलांचे सक्षमीकरण करण्यासाठी आयुक्त तथा प्रशासक मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली 'महिला सक्षमीकरण व बचत गट उत्पादन मेळावा' सोमवार, दिनांक १५ डिसेंबर २०२५ रोजी आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृह, पनवेल येथे सकाळी ११ ते ०५ वाजता पर्यंत आयोजित करण्यात आला आहे. या मेळाव्यांतर्गत बचत गट व्यवस्थापन याविषयावरती व्यवसाय वृद्धी मार्गदर्शक तज्ज्ञ डॉ.पुनम हुद्दार व कायदेशीर मार्गदर्शन करण्यासाठी ॲड. सरस्वती कदम यांना आमंत्रित करण्यात आले आहे. महानगरपालिकेच्या वतीने आयोजित या कार्यक्रमाद्वारे महिलांना प्रत्यक्ष मार्गदर्शन, प्रशिक्षण व प्रोत्साहन मिळून त्यांच्या बचत गटांच्या उपक्रमांना चैतन्य मिळणार आहे. बचत गट व्यवस्थापन, उत्पादकता वाढ, विपणन कौशल्य, तसेच आर्थिक स्वावलंबनाबाबत महिलांना मार्गदर्शन मिळणार आहे. याचबरोबर महिलांविषयक कायद्यांविषयी माहिती मिळणार आहे.

# थोडक्यात

## बसपाचे माजी नगरसेवक सुधीर कारंगल यांचा भाजपमध्ये प्रवेश

**अक्षराज : वसंत वडस्कर**




**दि.१२, चंद्रपूर :** नागपूर येथे भारतीय जनता पक्षात महत्त्वपूर्ण प्रवेश घडला. बहुजन समाज पार्टीचे इंडस्ट्रियल प्रभागाचे सलग तीनदा नगर सेवक राहिलेले माजी नगरसेवक सुधीर कारंगल यांनी आज (शुक्रवार) भाजपमध्ये अधिकृत प्रवेश केला. या कार्यक्रमाला भाजप प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण, आ. किशोर जोरगेवार, महानगर अध्यक्ष सुभाष कासनगोट्टूवार, प्रदेश कार्यकारणी सदस्य तुषार सोम, तसेच प्रकाश देवतळे, सुमित गुप्ता, हर्ष जयस्वाल यांची प्रमुख उपस्थिती होती. गेल्या काही महिन्यांमध्ये विविध पक्षांतील अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते आ. किशोर जोरगेवार यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवत मोठ्या संख्येने भारतीय जनता पक्षात प्रवेश करीत आहेत. कॉंग्रेससह इतर पक्षातील शेकडो कार्यकर्त्यांनी अलीकडेच भाजपमध्ये प्रवेश केला असून, पक्षाचा संघटनात्मक विस्तार वेगाने वाढत आहे. आज सुधीर कारंगल यांनीही ना. चंद्रशेखर बावनकुळे यांच्या निवासस्थानी पक्ष प्रवेश करून भाजपच्या विचारधारेवर विश्वास व्यक्त केला. त्यांच्या प्रवेशामुळे पक्षाची ताकद अधिक मजबूत होणार आहे. यावेळी आ. किशोर जोरगेवार म्हणाले कि, भारतीय जनता पक्ष हा सामान्य कार्यकर्त्यांच्या श्रमांवर उभा असलेला पक्ष आहे. आम्ही विकास, पारदर्शकता आणि लोकहित यांना प्राधान्य देणारे समाजकारण करतो. सुधीर कारंगल यांसारख्या समाजाभिमुख नेत्याचा पक्षात प्रवेश हा आमच्यासाठी अभिमानाची बाब आहे. गेल्या काही महिन्यांमध्ये विविध पक्षांतील कार्यकर्ते मोठ्या प्रमाणात आमच्यात सामील झाले आहेत. हा विश्वास आम्ही विकासकामांद्वारे आणि जनसेवेच्या माध्यमातून मिळवला आहे. असल्याचे यावेळी आ. किशोर जोरगेवार म्हणाले.

## जिल्हा दक्षता व नियंत्रण समितीची बैठक संपन्न

## ॲट्रोसिटी कायद्याअंतर्गत दाखल गुन्ह्यांचा आढावा

**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.१२, ठाणे :** ॲट्रॉसिटी कायद्याअंतर्गत ठाणे जिल्हा दक्षता व सनियंत्रण समितीची बैठक अपर जिल्हाधिकारी तथा जिल्हा दक्षता व नियंत्रण समितीचे सदस्य हरिश्चंद्र पाटील यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालयात संपन्न झाली. या बैठकीमध्ये अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती अत्याचार प्रतिबंध अधिनियम १९८९ अंतर्गत दाखल झालेल्या गुन्ह्यांबाबत आढावा घेण्यात आला.

अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती अत्याचार प्रतिबंध अधिनियम १९८९ अंतर्गत ठाणे शहर व ग्रामीण, नवीमुंबई, मिरा-भाईंदर या पोलीस विभागांच्या हद्दीत माहे जानेवारी २०२५ ते नोव्हेंबर २०२५ या कालावधीत खून, बलात्कार, विनयभंग, मारहाण, शिवीगाळ, जाळपोळ असे विविध प्रकाराचे एकूण १८६ गुन्हे नोंदविण्यात आले आहेत. त्यापैकी १०२ अत्याचारित व्यक्तींना एकूण ४२ लाख ५० हजार पर्यंत अर्थसहाय्य देण्यात आले आहे. ८४ प्रकरणांमध्ये कागदपत्रांच्या आभावामुळे अर्थसहाय्य देण्यात आलेले नाही.

कागदपत्रांअभावी अर्थसहाय्य प्रलंबित असलेल्या प्रकरणांत संबंधित विभागांनी तात्काळ कार्यवाही करुन सदर कागदपत्रे सहायक आयुक्त समाज कल्याण कार्यालयास उपलब्ध करुन द्यावेत. ॲट्रोसिटीचा गुन्हा दाखल होताच पोलीस विभागाने त्याबाबत तातडीने सहायक आयुक्त, समाज कल्याण ठाणे व नागरी हक्क संरक्षण शाखा यांना अहवाल सादर करावा आणि पिडीत व्यक्तींचे जातीचे दाखले व इतर आवश्यक कागदपत्रे प्राप्त करून घेण्यासाठी पोलीस विभागाने संबंधित पिडीत व्यक्तींकडे पाठपुरावा करावा. अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती अत्याचार प्रतिबंध अधिनियमाबाबत प्रचार प्रसार करुन विविध माध्यमांतून जनजागृती करावी, अशा सूचना अपर जिल्हाधिकारी हरिशचंद्र पाटील यांनी दिल्या.

या बैठकीस सदस्य सचिव सहायक आयुक्त समाज कल्याण समाधान इंगळे, ठाणे ग्रामीण पोलीस उप अधिक्षक निलम वाव्हळ, मीरा-भाईंदर पोलीस आयुक्तालयाचे सहायक पोलीस आयुक्त मदन बल्लाळ, प्र. माहिती अधिकारी प्रवीण डोंगरदिवे यांच्यासह समितीचे अशासकीय सदस्य उपस्थित होते.

## दिव्यातील ड्यू ड्रॉप शाळेत किळसवाणा प्रकार

## मुलांना बाथरुम मध्ये वापरायला गटाराचे पाणी

**अक्षराज : विनोद वास्कर**




**दि.१२, दिवा (ठाणे) :** दिवा शहरातील मातोश्री नगर येथे असलेल्या ड्यू ड्रॉप शाळेमध्ये किळसवाणा प्रकार घडला असून शाळेतील मुलांना बाथरुम मध्ये थेट गटाराचे पाणी वापरायला देण्याचा अत्यंत घृणास्पद प्रकार दिवा मनसेच्या पदाधिकाऱ्यांनी उघडकीस आणला आहे. ड्यु ड्रॉप शाळेमध्ये मुलांना बाथरुम मध्ये गटाराचे पाणी वापरायला दिले जात असल्याची तक्रार दिवा मनसेच्या महिला शाखाध्यक्ष अंकिता कदम यांच्याकडे पालकांनी केली होती. त्यानुसार आज त्याची सत्यता पडताळण्यासाठी आज मनसे पदाधिकाऱ्यांनी शाळेत भेट दिली. त्यावेळी हा अत्यंत किळसवाणा प्रकार समोर आला. मुलांच्या आरोग्याशी खेळ करणाऱ्या शाळा संचालक उत्तम सावंत यांच्यावर गुन्हा दाखल करून कडक शासन करण्याची मागणी दिवा मनसेच्या पदाधिकाऱ्यांनी केली. याबाबत तात्काळ शिक्षण विभागाचे उपायुक्त सचिन सांगळे यांना मनसे पदाधिकाऱ्यांनी सर्व व्हिडिओ पाठवल्यानंतर उपायुक्तांनी तात्काळ पाहणी करण्यासाठी शिक्षण विभागाची टीम पाहणी करण्यासाठी पाठवत असल्याचे सांगितले.

सदर प्रकरणाची गंभीर दखल घेऊन शिक्षण विभागाने संबंधित शाळेची मान्यता रद्द करून मुलांना दुसऱ्या शाळेत हलवावे अशी मागणी दिवा मनसेकडून करण्यात आली आहे. यावेळी मनसेचे दिवा शहर सचिव प्रशांत गावडे, विभाग अध्यक्ष प्रकाश पाटील, उपविभाग अध्यक्ष शैलेंद्र कदम, उपशाध्यक्ष जितेंद्र गुरव हे पदाधिकारी उपस्थित होते.